


## स्वच्छतागृह बांधकामासाठी चेकलिस्ट

| क्र. | विवरण | होय/नाही |
|---|---|---|
| १ | पॅसेजमधील पाणी बाहेर निचरा करण्यासाठी योग्य उतार दिला आहे काय ? | |
| २ | पॅसेजमधील पाणी बाहेर जाण्यासाठी पाईप किंवा आऊटलेट काढलेली आहे का ? | |
| ३ | संडास व मुलाच्या मुतारीत टाईल्स २ फुट ६ इंच उंचीपर्यंत बसवले आहे काय ? | |
| ४ | दोन्ही मुता-यातील गटारास ग्लेझ टाईल्स / पी. व्ही. सी. पाईप अर्धवर्तुळाचे बसवले आहे काय ? | |
| ५ | गटारीस मुत्र निचरा होण्यासाठी योग्य उतार आहे काय ? | |
| ६ | मल व मुत्र संकलनासाठी स्वतंत्र शोषखड्डे बांधले आहेत काय ? मल आणि मुत्राचे पाईप त्यात सोडले आहे काय ? वर झाकण बसविले आहे काय ? | |
| ७ | पाण्यासाठी हौद बांधला आहे काय ? | |
| ८ | हौद बांधला असल्यास त्याची निम्नतम पातळी नळापेक्षा उंच पातळीवर ठेवलेली आहे काय ? जेणेकरून पाण्याचा अनावश्यक साठा राहणार नाही. | |
| ९ | संडासमध्ये नळ जोडणी केलेली आहे काय ? नळाला चांगल्या स्थितीत तोटी आहे काय ? | |
| १० | पत्र्यांना उतार योग्य दिला आहे काय ? | |
| ११ | स्वच्छतागृह वापरात आहे काय ? | |
| १२ | स्वच्छतागृहाच्या पाण्याच्या टाकीत पाणी भरण्याची सोय आहे काय? | |





## प्रास्ताविक

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील जि. प. शाळांना सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा पुरविण्याचे धोरण राज्य व केंद्र शासनाच्या संयुक्त प्रयत्नाने पूर्ण करण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांची बौध्दिक पातळी ख-या अर्थाने वाढवावयाची असेल तर मुला / मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे तसेच सर्व भौतिक सुविधा पुरविणे हे शासनाचे कर्तव्यच बनते. आर्थिकदृष्टया सुदृढ असलेले नागरिक खाजगी शाळेत त्यांच्या मुलांना प्रवेश देऊन शिक्षण देऊ शकतात. पण खेड्यातील गोर-गरीब नागरिकांच्या पाल्यांना सरकारी जि. प. शाळेत शिक्षण घेतल्याशिवाय पर्याय नाही. म्हणून शासनाने आज गोर-गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे निश्चित केले आहे.

केंद्र शासनाने संपूर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत प्रत्येक जि. प. शाळांना मुले / मुलींच्या संख्यावर आधारित स्वच्छतागृहाची सुविधा पुरविण्याचे धोरण आखले आहे किंवा प्रत्येक शाळेत कमीत कमी मुले व मुलीसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्याचे नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने लातूर जिल्हयात एकूण ११९२ जि. प. शाळा असून या शाळेसाठी प्रत्येकी दोन युनिटप्रमाणे २३८४ स्वच्छतागृह बांधणे अपेक्षित आहे. ज्या ठिकाणी पूर्वीचे बांधलेले स्वच्छतागृह आहे अशा शाळा वगळून सन २००४-०५ व २००६-०७ या वर्षांतर्गत उपरोक्त संख्या निश्चित झाली आहे. अशा बांधलेल्या स्वच्छतागृहाचे २ विविध प्रकारचे बांधकामाचे नमुने निश्चित करण्यात आले आहेत.



लातूर जिल्हयातील शाळानिहाय स्वच्छतागृह युनिट संख्या पुढीलप्रमाणे आहे.

## लातूर जिल्हयातील शालेय स्वच्छतागृहे

( युनिट संख्येनुसार )

| अ.क्र. | तालुका | २००४-०५ | | २००६-०७ | | प्रगतीपथा-वरील कामे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | पूर्ण | मंजूर | पूर्ण | |
| १) | लातूर | १२१ | १२१ | १७६ | १५१ | १३ |
| २) | रेणापूर | ९० | ९० | १०९ | ९३ | ० |
| ३) | औसा | १११ | १११ | १६९ | १५८ | ० |
| ४) | निलंगा | १११ | १११ | २१९ | १९९ | ४ |
| ५) | शिरूर अ. | ४९ | ४९ | ६८ | ६८ | ० |
| ६) | देवणी | ४० | ४० | ९२ | ८२ | ६ |
| ७) | उदगीर | ८२ | ८२ | १९४ | १७७ | १ |
| ८) | जळकोट | ६१ | ६१ | ५४ | ५४ | ० |
| ९) | अहमदपूर | १४७ | १४७ | १६१ | १२९ | १४ |
| १०) | चाकूर | ८० | ८० | १८२ | १३७ | ११ |
| | **एकूण** | **८९२** | **८९२** | **१४२४** | **१२४८** | **४९** |

काही कामे प्रगतीपथावर असून काही जागेअभावी किंवा इतर कारणामुळे चालू झालेली नाहीत. आता ही स्वच्छतागृहे सर्व विद्यार्थ्यांसाठी नियमित वापरात यावीत, त्यांची स्वच्छता व दुरूस्ती आणि देखभाल यात प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना सहभागी करून घेता यावे आणि स्वच्छतेच्या सर्व बाबींचे सवयीत रूपांतर व्हावे यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा शालेय स्वच्छता विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे.





## शालेय जीवनात स्वच्छतेचे महत्व

आपणास मिळालेले सुंदर शरीर, निरोगी, आनंदी व सुखी राहणे हे पूर्णपणे आपल्या सभोवतालचे वातावरण व स्वच्छतेच्या सवयी यावर अवलंबून असते. तरीही आपण चुकीच्या सवयीमुळे व काहीवेळा आळशीपणाने त्याकडे दुर्लक्ष करतो. नैसर्गिक वातावरण आपण प्रदुषित करतो. हवा, अन्न, पाणी इत्यादी दुषित होते त्यामुळे आपणास त्रास होतो, हे माहिती आहे. परंतु तरीही आम्ही आणखीसुध्दा स्वच्छतेच्या बाबतीत बेफिकिर आहोत. माणसाला होणारे ८० टक्के रोग हे अस्वच्छतेमुळे होतात. त्यामुळे नियमित वैयक्तिक स्वच्छता व परिसर स्वच्छतेचा अवलंब करणे आवश्यक आहे.

आपल्या सभोवतालच्या घाणीला, अस्वच्छतेला आपणच जबाबदार आहोत व ते स्वच्छ करणेही आपलीच जबाबदारी आहे असे कुणालाही वाटत नाही. स्वच्छता करणे हे दुस-याचे काम आहे असे समजून आपण याकडे दुर्लक्ष करतो. शेकडो हातांनी केरकचरा टाकून घाण करावयाची आणि केवळ दोन चार हातांनी ती साफ होऊ शकेल का ? तर नाही. म्हणून स्वच्छता राखणे व सफाई करणे हे आपणा सर्वांचे काम आहे.

स्वतःचे शरीर, आपले घर, परिसर, शाळा तसेच गाव घाणीपासून मुक्त, प्रदूषणमुक्त, स्वच्छ व सुंदर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी स्वच्छतेच्या सवयी विद्यार्थीजीवनापासून आपल्या अंगी असणे आवश्यक आहे. म्हणूनच उद्याचा नागरिक असणा-या या विद्यार्थांना अगोदरच याची जाणीव करुन देऊन प्रत्येक घरापर्यंत, प्रत्येक नागरिकापर्यंत स्वच्छतेचा हा संदेश पोहोचवावयाचा आहे.





## विद्यार्थ्यांनी आचरणात आणावयाची दिनचर्या




## शाळेमध्ये शौचालयाची आवश्यकता

- संडास बांधल्यामुळे शाळेतील मुलांना शौचासाठी किंवा लघवीसाठी बाहेर जाण्याची गरज भासत नाही. त्यामुळे परिसर स्वच्छ राहतो. दुर्गंधी येत नाही. मुले निरोगी राहतात.
- संडास वापरण्यामुळे शौचानंतर साबणाने हात धुणे ही चांगली सवय लागते व पोटाचे विकार होत नाहीत.
- शाळेत शिकणा-या सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहते. त्यांना कोणताही रोग होऊ नये व त्यांची सर्व शक्ती आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी कामी यावी या उद्देशाने शालेय स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
- स्वच्छता आणि आरोग्य याचे ज्ञान विद्यार्थीदशेपासून दिल्याने विद्यार्थ्यांना स्वच्छतेची लागलेली सवय आयुष्यभर उपयोगी पडते .

## शालेय स्वच्छतागृहाची वैशिष्ट्ये

- स्वच्छ, सुंदर व मजबूत
- अतिशय कमी खर्चात बांधकाम
- बांधकामाचे सोपे तंत्रज्ञान
- आरोग्यपूर्ण व सफाई कामगार मुक्त
- प्रदूषणापासून मुक्त
- इको फ्रेंडली , पर्यावरण संतुलित
- १ ते १.५ लिटर पाण्यात शौचालयाची संपूर्ण स्वच्छता होत असल्यामुळे पाण्याचा वापर कमी होतो त्यामुळे दुर्गंधी पसरत नाही.
- पाण्याचा वापर कमी झाल्यामुळे विष्ठेचे रूपांतर खतामध्ये लवकर होते व त्यामुळे विष्ठेमधील घातक जीवाणूंचा प्रसार कमी होतो.
- या प्रकाराचे शालेय शौचालय हे काळ्या जमिनीवर सुद्धा योग्य तंत्रज्ञानाचा वापर करुन बांधता येते.



# शालेय स्वच्छतागृह बांधकामासाठी घ्यावयाची विशेष काळजी

- शालेय स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, हात धुण्याची सुविधा ही सहज उपलब्ध होईल, दीर्घकाळ टिकेल आणि सातत्याने आरोग्यपूर्ण राहील याकडे लक्ष पुरवावे.
- स्थानिक साहित्य वापरून व योग्य तंत्रज्ञानाची निवड करून शालेय स्वच्छतागृहाचे अंदाजपत्रक तयार करून बांधकाम करावे.
- शालेय स्वच्छतागृह दोन खड्डयाचे शौचालय असलेलेच असावे.
- मुतारीसाठी स्वतंत्र शोषखड्डा असावा व तो योग्य उतारावर असावा, पाईप योग्य वहनव्यवस्था असणारे बसवावेत. मुत्र हे शौचालयाच्या शोषखड्डयात सोडू नये.
- वापरण्यासाठी सुरक्षित, आनंददायी व पुरेसा उजेड असणारे असावे, विद्यार्थ्यांच्या उंचीला पुरतील असे कडी - कोंडे असावेत.
- मुलींच्या स्वच्छतागृहासाठी आडोसा होईल असे दरवाजे बसवावेत. ते गंजणार नाहीत किंवा जमिनीला घासणार नाहीत असे बसवावेत.
- शौचालयासाठी ४५ डिग्री. उताराचे भांडे, २० मिमी. वॉटरसील असलेला ट्रॅक आणि भांड्याच्या बाजूला घट्ट बसवलेले पायटे असावेत.
- शौचालयाची उंची पूर्ण ६ फुट असावी व दरवाजे शक्यतो बाहेरील बाजूस उघडणारे असावेत.


वॉश बेसीन






शौचालयासाठी शोषखड्डा

मुतारीसाठी शोषखड्डा




वीटाच्या तुकड्याचे भराव

४५ डिग्री. उताराचे भांडे





- मुतारीसाठी शोषखड्डा योग्य ठिकाणी, योग्य अंतरावर असावा.
- स्वच्छतागृहातील शौचालयासाठी, मुतारीसाठी चांगल्या टाईल्स बसवाव्यात.
- आतून, बाहेरून गिलावा, योग्य दर्जाचे छत, हात धुण्याची व्यवस्था व स्वच्छता राहील याची काळजी घेतलेली असावी.
- शालेय स्वच्छतागृहाचा सतत वापर, देखभाल व दुरूस्ती याची जबाबदारी मुख्याध्यापक व शालेय शिक्षण समिती यांची राहील.
- अतिशय दर्जेदार रंग रंगोटी करावी व त्यावर नावे टाकावीत.
- माध्यमिक शाळेतील मुलींसाठी मासिक पाळीच्या वेळी सॅनिटरी नॅपकीन्स अथवा तत्सम गोष्टी पुरण्याची अथवा जाळण्याची व्यवस्था करावी.
- संपूर्ण स्वच्छतागृहाला योग्य व आकर्षक रंग द्यावा. योग्य त्या ठिकाणी नावे टाकावीत तसेच प्रवेश / दिशा दर्शवणारे बाण असावेत. स्वच्छतागृहाच्या आत / बाहेर योग्य ठिकाणी सुवाच्य अक्षरात स्वच्छतेशी संबंधित सुविचार लिहावेत.
- पावसाळयात स्वच्छतागृहात जाताना चिखल माती जाऊ नये याकरीता स्वच्छतागृहापर्यंत जाणारा रस्ता दगड, वीटा, खडी वापरून किंवा फरशी बसवून करावा.
- स्वच्छतागृहाचा परिसर स्वच्छ, सुंदर व देखणा राहील असे पहावे. शोभेची झाडे व फुलझाडांच्या कुंड्या ठेवाव्यात. नित्य सरावाने विद्यार्थी त्याची निगा राखतील.


ग्लेझ टाईल्स


स्वच्छतागृहाचा स्वच्छ व सुंदर परिसर


मुलांसाठी मुता या


शालेय स्वच्छतागृह



## शालेय स्वच्छतागृहात करावयाच्या अतिरिक्त सोयी

- शौचालयात शक्यतो नळ नसावे त्यामुळे अनावश्यक पाणी वाया जाऊ शकते. मात्र प्रत्येक शौचालयात एखादा मग अथवा लहान बादली (२ लि.) असणे आवश्यक आहे.
- प्रत्येक शौचालयात भिंतीवर योग्य ठिकाणी एखादे हूक अथवा हूकपट्टी लावावी. दप्तर, बॅग किंवा मुलींना ओढणी ठेवण्यासाठी अथवा ज्या मुलांना कपडे काढून बसण्याची सवय असते त्यांच्यासाठी याचा वापर होऊ शकतो.
- शौचालयाबाहेर पाण्याच्या टाकीजवळ साबण अथवा स्वच्छ राख योग्य ठिकाणी ठेवावी.
- स्वच्छतागृहाच्या संपूर्ण नियमित सफाईसाठी त्या परिसरात योग्य ठिकाणी पुरेशा प्रमाणात लांब दांडीचे ब्रश, खराटे ठेवावेत.
- अपंग विद्यार्थ्यांसाठी शौचालयात वेगळी व्यवस्था करावी. याकरीता नेहमीच्या भांड्यावर बसेल अशी फोल्डींग कमोड खुर्ची हा एक चांगला पर्याय होऊ शकतो. किंवा गावातल्या गावात अशा प्रकारचे एखादे लाकडी स्टूल करून घेता येणे शक्य असते. त्यामुळे अशा स्टूलचा वापर केला तरी चालेल.



शौचालयात मग / बकेट



अपंगासाठी कमोड खुर्ची



सफाईसाठी लांब दांडीचे ब्रश



## शालेय स्वच्छतागृह वापरताना घ्यावयाची काळजी

- शौचालयाचा वापर करण्यापुर्वी शौचालयाच्या भांड्यात थोडे पाणी टाकून भांडे ओले करावे म्हणजे मल भांड्याला चिकटणार नाही व सफाईस त्रास होणार नाही .
- मैला कोंबड्यातून दृष्टीआड होण्याइतपत पुरेसे पाणी वापरावे.
- संडासाजवळ पुरेशा पाण्याची व्यवस्था असावी.
- संडास भांड्यामध्ये मुले दगड, प्लॅस्टिक, कचरा इ. टाकतात त्यामुळे संडास तुंबतो व दुर्गंधी येते. असे घडू नये म्हणून याची काळजी घ्यावी.
- शौचालय साफ करण्यासाठी जंतुनाशकांचा वापर करु नये.
- शाळेचे संडास बंदिस्त असावेत. भिंतीवर काचेचे तुकडे बसवावेत.
- शालेय स्वच्छतागृहाचा परिसर नियमित स्वच्छ ठेवावा.
- किरकोळ दुरुस्ती तातडीने करून घ्यावी.
- विद्यार्थ्यांचे गट पाडून त्यांच्यामार्फत नियमितपणे स्वच्छतेची जबाबदारी सोपवावी व देखरेख ठेवावी.
- लघवीच्या सुट्टीत एकाचवेळी सर्व वर्ग सोडल्यास मर्यादित स्वच्छतागृहामुळे नंबरप्रमाणे बारीत उभे न राहता विद्यार्थी आजूबाजूला उघड्यावरच जातात म्हणून ज्याप्रमाणे आपल्या घरी एकच स्वच्छतागृह असूनही कुटुंबातील अनेक व्यक्ती सवयीप्रमाणे आपोआप नियोजनबद्धपणे त्याचा वापर करतात त्याचप्रमाणे आपल्या शाळेतील विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात स्वच्छतागृहांची संख्या मर्यादित

भिंतीवर काचेचे तुकडे





पाण्याचा हौद

बाहेर उघडणारा दरवाजा व पुरेशा पाण्याची नळाद्वारे व्यवस्था





असल्यामुळे जर एका वेळेस एकाच वर्गाची सुट्टी करुन आळीपाळीने सुट्टीचे वर्ग नियोजन केल्यास सर्वांना स्वच्छतागृह वापरण्याची निरंतर सवय लागेल.

## गुणवत्तापूर्ण स्वच्छतागृह

जिल्हयात बांधण्यात आलेले सर्व स्वच्छतागृहे हे अत्यंत गुणवत्तापूर्ण व्हावे या दृष्टीने बांधकामात खालील बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे.

- दर्जेदार बांधकाम.
- स्वच्छतागृहामध्ये २.५ फुट उंचीपर्यंत ग्लेझ टाईल्स परदी व ग्लेझ टाईल्स फरशी.
- मुलींच्या मुतारीला लेडीज पॅन.
- मुलांच्या मुतारीला समोरच्या भिंतीवर २.५ फुट उंचीपर्यंत ग्लेझ टाईल्स परदी.
- मुली / मुलांच्या मुतारीचे मल निचरा वाहून नेण्यासाठी ग्लेझ टाईल्स गटारी.
- स्वच्छतागृह व मुतारीसाठी स्वतंत्र शोषखड्डा.
- पाणी साठवण्यासाठी हौद.
- हौदापासून पाईपलाईनद्वारे स्वच्छतागृहाला पाणी पुरविण्याची सोय व स्वतंत्र तोट्या.
- मुतारीतून येणारे मल हे उघड्यावर न पडण्याची काळजी.
- दोन्हीकडच्या बाजूने प्रवेशद्वार व त्या ठिकाणी पटाची व्यवस्था.
- पॅसेजमध्ये पावसाचे पाणी साचू नये याची काळजी.

वरील सर्व बाबींची काळजी घेऊन शालेय स्वच्छतागृह बांधण्याचे व ते गुणवत्तापूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून करण्यात आले.



मुलींच्या मुतारीसाठी लेडीज पॅन



मुतारीच्या / शौचालयाच्या पॅसेजमधील उतार






मुतारीसाठी गटारीची सोय






वॉश बेसीनजवळ साबण व टॉवेल असावे.




शालेय शौचालय नमुना आराखडा - १




नका बसू उघड्यावर संडासाला, संधी मिळेल रोगराई पसरण्याला.





शालेय शौचालय नमुना आराखडा - २






शौचालयाच्या भिंतीवर मुंडा-या असाव्यात.

पाणी शुध्दीकरण नियमित करू, सर्वांचे जीवन आरोग्य संपन्न करू.



## सांडपाण्याचे व्यवस्थापन

सांडपाणी किंवा साचलेले पाणी तुंबलेले असेल तर त्यामध्ये विविध प्रकारचे डास निर्माण होतात आणि तेच मनुष्याला चावले तर मलेरिया, डेंग्यु, हत्तीपाय, मेंदुज्वर (जपानी ताप) असे आजार होतात.

- शाळेचा परिसर जर मोठा असेल तर तेथे परसबाग करुन सांडपाण्याचा योग्य प्रकारे निचरा करावा.
- अपुरी जागा असेल तर ३ X ३ चा शोषखड्डा करावा. त्या खड्डयामध्ये सर्वात खालच्या थराला मोठे दगड, त्यावरती छोटे गोटे, त्यावरती मध्ये छिद्र असलेले मडके ठेवून त्याच्या कडेला वाळू भरावी व घरातील सांडपाणी मडक्यामध्ये सोडावे. अशाप्रकारे अपु-या जागेत सांडपाण्याचा निचरा करावा. सर्व पाणी मुरु शकणार नसल्यास अशासाठी पाझरखड्डा (लिचपीट) बनवावा.
- शाळेजवळ पाणी तुंबलेला खड्डा, पाण्याची टाकी किंवा आड असेल तर त्यात गप्पी मासे सोडावेत. गप्पी मासे डासांची अंडी खातात. त्यामुळे डासाची उत्पत्ती होत नाही.
- शाळेत असलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट करण्यासाठी परसबाग आणि शोषखड्डे करावेत.
- शाळेजवळील गटारे तुंबलेली नसतील याची काळजी घ्यावी.
- शाळेजवळील गटारामधून गोळा झालेले सांडपाणी ओढा किंवा नदीला न सोडता त्या पाण्याचे स्थिरीकरण करुन त्या पाण्याचा शेतीसाठी पुनर्वापर करणे चांगले.

**सांडपाण्यापासून परसबाग**





**पाण्याच्या टाकीची सोय**

**पाण्यासाठी नळाचे स्वतंत्र कनेक्शन**

